स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**P.G. SECTION**

**Phone: (02462) 229242**
**Fax : (02462) 229574**

**Website: www.srtmun.ac.in**

**E-mail: dr.pg.srtmun@gmail.com**


जा.क्र. पीजी/परीक्षा/२०१५–२०१६/३३४९ दि.२३/१२/२०१५

## सूचना

या व्दारे प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ यांना या व्दारे कळविण्यात येते की, मराठवाडा विभागात असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रात मागील तीन – चार वर्षापासून कमी प्रमाणात पाऊस झाला आहे. तसेच चालू शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये देखील विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चारही जिल्हयात पाऊस अत्यंत कमी पडल्याने, काही भागात सद्यस्थितीत पाणी टंचाई निर्माण झालेली असून एप्रिल महिन्यात पाणी टंचाई अधिक भीषण होण्यांची शक्यता आहे. विद्यर्थ्यांना परीक्षा काळात कडक उन्हाचा त्रास देखील होईल. शैक्षणिक वेळापत्रकानुसार व्दितीय सत्रातील पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार एप्रिल महिन्यात आहेत. दि.२१/१२/२०१५ रोजी संपन्न झालेल्या मा. विद्या परीषद बैठकीत व्दितीय सत्रातील पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा नियोजित तारखांच्या आगोदर घेण्याबाबत मा. विद्या परीषद बैठकीत विषय ठेवण्यांत आला होता.

व्दितीय सत्रात ९० दिवस शैक्षणिक कार्यदिवस भरणे आवश्यक आहे. या संदर्भात दर दिवशी एक जादा तासीका घेवून, रविवार व येणा–या सार्वजनिक सुट्टिच्या दिवशीच्या (शक्य असेल तेव्हा) जादा तासीका घेवून, अभ्यासक्रम पूर्ण करण्यांची कार्यवाही महाविद्यालय स्तरावर प्राचार्यांनी व संकुल स्तरावर संचालक यांनी करावी अशी चर्चा होवून चर्चे अंती मा. विद्या परीषद बैठकीत परीक्षा काळात कडक उन्हाळयाचा व भीषण पाणी टंचाईचा त्रास विद्यार्थ्यांना होवू नये या साठी साधारणत: १५ मार्च २०१६ पासून पदवी व पदव्युत्तर परीक्षा सुरू कराव्यात असे ठरले.

या बाबत शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी आपली मते नोंदवावीत म्हणजे त्याप्रमाणे या बाबत परिक्षेचे अंतिम वेळापत्रक तयार करण्यात येईल.

**स्वा/–**
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत :–

१. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यांत येते की, सदर सुचना सर्व शिक्षक व विद्यार्थ्यास निर्देशनास आणुन द्यावी.
२. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यांत येते की, सदर सुचना सर्व शिक्षक व विद्यार्थ्यास निर्देशनास आणुन द्यावी.
३. मा. परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ.
४. श्री. ए. ए. दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, युजीसी संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यांत येते की, सदर पत्र BCUD व NEWS/CIRCULAR-BCUD अतंर्गत Regarding Prepone of UG & PG Exam या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात यावी.